# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०४/२०२४ (सोमवार) दुपार**

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई**

**वाहनासह एकुण ३०१६०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त**

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत येणाऱ्या ०३ कि.मी. अंतरावर मौजा जबलपुर ते नागपुर मेन हायवेरोडावर टेकाडी पुलाखाली दिनांक १४/०४/२०२४ चे ०२.३० वा. दरम्यान मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय कामठी विभाग कामठी डॉ. संतोष गायकवाड हे स्टाफसह पोस्टे कन्हान परिसरात सरकारी वाहनाने जिल्हा गस्त पेट्रोलिंग करित असता गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, मौजा जबलपुर ते नागपुर मेन हायवेरोडवर टेकाडी पुलाखाली ट्रकच्या साहाय्याने अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून स्टाफने घटनास्थळी जावुन १० चक्का टिप्पर गाडी क्र. एम.एच—३१/एफ.सी—६००० हि आमडी फाटयाकडुन कन्हान मार्ग नागपुरकडे जातांनी दिसला असता त्यास टेकाडी पुलाखाली थांबवुन सदर वाहनाची पाहणी केली असता सदर टिप्पर मध्ये रेती मिळुन आली. सदर १० चक्का टिप्पर गाडी क्र. एम.एच—३१/एफ.सी—६००० चा **चालक आरोपी नामे— १) सागर चेतन मासुरकर वय २९ वर्ष रा. मच्छी मार्केट महादुला कोराडी ता. कामठी २) रोशन अशोक वर्मा वय२१ वर्ष रा. मच्छी मार्केट महादुला कोराडी ता. कामठी (कंडक्टर)** यांनी आपल्या ताब्यातील ट्रकमध्ये विनापरवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातुन एकुण ०४ ब्रास रेती किंमती १६०००/— रू. चा तसेच १० चक्का टिप्पर गाडी क्र. एम.एच—३१/एफ.सी—६००० किंमती ३०,००,०००/—रू. असा एकुण ३०१६०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पो.शि. धनराज सुखदेव चौरपगार, पोस्टे कन्हान यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे **आरोपी चालक नामे— १) सागर चेतन मासुरकर वय २९ वर्ष रा. मच्छी मार्केट महादुला कोराडी ता. कामठी २) रोशन अशोक वर्मा वय २१ वर्ष रा. मच्छी मार्केट महादुला कोराडी ता. कामठी (कंडक्टर) व मालक नामे— ३) अशोक नगरारे वय ४५ वर्ष रा. काटोल नाका चौक नागपुर** यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. १) व २) यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय कामठी विभाग कामठी डॉ. संतोष गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली चालक मारबते, पो.शि. धनराज सुखदेव चौरपगार यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर